# ऋणनिर्देश

प्रस्तुत संशोधनासाठी अनेक व्यक्तींनी सहाय्य केले,त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे संशोधकाचे कर्तव्य आहे.

गुरू हा केवळ मार्गदर्शक नसतो तर तो खऱ्या अर्थाने सद्गुरूच असतो, याची प्रचिती संशोधकास संशोधन कार्याच्या दरम्यान आली. 'मी सोबत आहे' हे ठामपणे बिंबवून तो शिष्याचे जीवन प्रकाशमय करत असतो. संशोधन कार्याच्या सुरूवातीपासून शेवटपर्यंत संशोधकास सतत सर्वोत्कृष्ट कार्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन देणारे, संशोधकाच्या संशोधन कार्याच्या क्षमतेवर विश्वास दाखविणारे, संशोधकाचे मनोबल उंचावून मार्गदर्शन करणारे, मार्गदर्शक व पितृतुल्य व्यक्तिमत्त्व आदरणीय डॉ. चंद्रकांत बोरसे यांच्या ऋणात कायम रहायला संशोधकास आवडेल. प्रत्यक्ष संशोधन कार्यातील विविध समस्यांना सामोरे जात असताना मार्गदर्शकांनी दिलेली प्रेरणा निर्णायक ठरली. संशोधन कार्य निश्चित वेळेत पूर्णत्वास नेता आले, याचे सर्व श्रेय म्हणूनच मार्गदर्शकांना जाते.

संशोधकाच्या आजपर्यंतच्या प्रवासात शैक्षणिक जीवनाला आकार देणारे, सतत अचूक व उत्कृष्ट काम करण्यास प्रेरणा देणारे संशोधकाचे आदर्श व्यक्तिमत्त्व व आझम शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भूषण पाटील सर यांचे अत्यंत नम्रपणे आभार मानतो. मराठा विद्या प्रसारक समाजाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. वाजे यांनी संपूर्ण संशोधन कार्यात केलेल्या सहकार्याबद्दल त्यांनाही मनापासून धन्यवाद .....!

पीएच. डी. कोर्सवर्कमधील कार्य असेल की, शैक्षणिक संशोधनातील कोणतीही समस्या असेल, प्रत्येक वेळी आपला बहुमूल्य वेळ देऊन शंकांचे निरसन करणाऱ्या व प्रत्येक भेटीत आधार देणाऱ्या शिक्षणशास्त्र व विस्तार विभागातील प्रपाठक डॉ. मेघा उपलाने यांचेही ऋण व्यक्त करतो.

संशोधकाच्या जीवनातील मार्गदर्शक प्रा. जयवंत खारतोडे यांनी यशाच्या शिखरावर भरारी घेण्यासाठी आत्मविश्वास दिला म्हणून त्यांचेही मन:पूर्वक आभार. तसेच, मूळ हिंदी भाषेतील प्रमाणित भावनिक बुध्दिमत्ता चाचणीचे मराठी भाषेमध्ये भाषांतरण करण्यासाठी मदत करणारे अहमदनगर महाविद्यालयातील मानसशास्त्र विभागातील प्राध्यापक व समुपदेशक डॉ. प्रीतम बेदरकर व डॉ. बाळासाहेब दिघे यांनाही धन्यवाद.

संशोधनातील संख्याशास्त्रीय विश्लेषणासाठी अत्यंत मोलाची मदत करणारे डॉ. अतुल गायकवाड यांचेही आभार मानतो. याशिवाय संशोधनातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध संबंधित साहित्य व संशोधने यांचा संदर्भ म्हणून वापर करण्यासाठी मदत करणारे ॲड. आनंद भोसले यांचा संशोधक ऋणी आहे. तसेच सतत कार्यमग्न असलेले राष्ट्रपती आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त व्यक्तिमत्त्व श्री. रामदास ठाकर (गुरूजी) यांचा आवर्जुन उल्लेख करावा लागतो, की ज्यांनी सातत्याने संशोधन कार्य करत राहण्यासाठी आत्मविश्वास दिला.

प्रस्तुत संशोधनातील भावनिक बुध्दिमत्ता विकसन कार्यक्रम राबविण्यासाठी एक महिन्यापेक्षा अधिक काळ महाविद्यालय उपलब्ध करून देणारे डॉ. एन. जे. पाऊलबुधे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अहमदनगर येथील प्राचार्या डॉ. रेखाराणी खुराना व सुभाष आण्णा कुल शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. नीलिमा तिखे यांनी केलेली मदत सदैव स्मरणात राहील. तसेच, पथदर्शी अभ्यासासाठी सहकार्य करणारे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, घारगाव येथील प्राचार्य डॉ. जगदीश राठोड यांचाही संशोधक ऋणी आहे.

विदेश मंत्रालय, नवी दिल्ली येथे कार्यरत असलेले संशोधकाचे कनिष्ठ बंधू श्री. वैभव घालमे यांनी संशोधकास संशोधन कार्यासाठी प्रथमपासूनच 'प्रेरणादायी ऊर्जा' दिली त्याबद्दल त्यांनाही धन्यवाद....!

प्रत्यक्ष संशोधन कार्यात मदत करणारे मित्र श्री. किरण आबनावे, श्री. गोरख मेटकरी व श्री.दिगांबर हरबा यांचाही संशोधक आभारी आहे.संशोधनातील सर्व प्रकारच्या शुध्दलेखनातील दुरूस्ती हसतमुखाने करून देणारे साईकृपा कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रघुनाथ शेळके यांचा विशेषत्वाने उल्लेख करतो.

संशोधनासाठी आवश्यक संशोधनात्मक प्रबंध व संदर्भ पुस्तके उपलब्ध करून देणारे शिक्षणशास्त्र व विस्तार विभागातील ग्रंथपाल श्री. स्वप्नील कुलकर्णी यांचे आभार मानतो. संशोधनाचे टंकलेखनाचे सर्व कार्य अत्यंत कमी कालावधीत सुबकपणे करणाऱ्या संकल्प टायपिंग इन्स्टिट्युटच्या प्राचार्या सौ. कविता शहाजी दातीर यांना मनापासून धन्यवाद. याशिवाय कार्यक्रम निर्मितीमध्ये बहुमूल्य मदत करणारे संशोधकाचे मित्र श्री. शिवाजी वाजे यांचाही संशोधक ऋणी आहे.

संशोधकाच्या पीएच. डी. कार्यात सदैव खंबीरपणे उभी असणारी संशोधकाची आई श्रीमती मनीषा घालमे व कौटुंबिक जबाबदारी सांभाळून सतत संशोधनातील कोणत्या ना कोणत्या कार्यात मदत करणारी सहचारीणी सौ. वर्षा घालमे यांचा सहभाग अनमोल आहे.

संशोधकाच्या आजपर्यंतच्या शैक्षणिक वाटचालीचे प्रमुख प्रेरणास्थान, जीवनातील प्रत्येक पायरीवर केलेल्या प्रयत्नांना शाबासकी देणारे, प्रत्येक यशाचे अभिनंदन करणारे व ज्यांच्यामुळे संशोधकाचे अस्तित्व आहे असे संशोधकाच्या आजपर्यंतच्या यशाचे शिल्पकार संशोधकाचे वडील कै. चंद्रकांत घालमे उर्फ 'आबा' यांच्या चरणी प्रस्तुत पीएच.डी.प्रबंध समर्पित करतो....